REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331 (UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# ॲट्रॉसिटी द गेम ऑफ मॅन्युप्युलेशन



**Dr. Tushar Nikalje**

## प्रस्तावना

आंतरराष्ट्रीय क्रिकेट मॅच चालू असते ही मॅच लोक उत्सुकतेने पाहात असतात. मॅच अटीतटीची चालू असते. शेवटचा ओव्हर चालू असतो, त्याचा शेवटचा चेंडू, जिंकण्यास चार धावा बाकी असतात, लोकांची उत्सुकता शिगेला पोहोचलेली असते, कारण बॅटस्मन भरवशाचा फलंदाज असतो. या फलंदाजाचा पूर्वइतिहास अतिशय चांगला असतो. मॅच जिंकणार अशी खात्री लोकांना असते. मॅच जिंकली नाही तरी टाय होणार अशीही खात्री लोकांना असते. शेवटच्या बॉलवर हा फलंदाज संपूर्ण ताकद वापरून पिचच्या निम्म्या भागात पुढे येऊन बॅट चेंडूवर फिरवितो, लोकांना असे वाटते आता हा चौकार किंवा षटकार बसणार, पण दुसऱ्याच क्षणी त्याची विकेट पडलेली असते, स्टेडीयमवर हाहाकार माजतो. कारण मॅच हरलेली असते. सगळीकडे लोकांमध्ये, प्रसार माध्यमांमध्ये (टिव्ही, वर्तमानपत्रे, साप्ताहिके) या मॅचची चर्चा होते नंतर आठ दहा दिवसांनी लोक हे सर्व विसरतात, परंतु एक महिन्यांनी पुन्हा वर्तमानपत्रात व टिव्ही चॅनेलवर याच मॅचची बातमी येते. शेवटच्या चेंडूवर आऊट झालेल्या बॅटस्मनने मॅच फिक्सींगमध्ये काही लाख-कोटी रुपये घेतले. यामध्ये उतरलेल्या सट्टा-बाजाराच्या व्यक्तींचा फायदा झालेला असतो. या सर्व प्रकाराला मॅच फिक्सींग म्हणतात. बऱ्याच वेळा वर्तमानपत्रात बातम्या वाचतो. काही आर्थिक व्यवहारात मंत्री जेलमध्ये जातात. त्याला आर्थिक गैरव्हवहार किंवा भ्रष्टाचार म्हटले जाते. ऑलींपीकमध्ये आशियाई, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत खेळाडू पात्रता फेरीत अपात्र ठरतात, त्याचे कारण त्यांच्या शारीरिक चाचणीत रक्तामध्ये ड्रग्ज (उत्तेजित पदार्थ) प्रमाण जास्त आढळते. या प्रकाराला डोंपिंग म्हणतात. प्रशासन, शिक्षणव्यवस्था यामध्ये अशाच धर्तीवर घडत असलेल्या घटनांना White Color Crime and criminal careers म्हणून ओळखले जाते. वित्त विभागाशी संबंधित प्रकरणांना मॅन्युप्लेशन ऑफ अकौंटस् म्हणतात. या सर्व खेळांमध्ये त्यांचेशी संबंधित व्यवस्थांनी केलेल्या कृतीस ही सर्व नावे/संबोधने दिली जातात.

ॲट्रॉसिटी प्रकरणांची हाताळणीदेखील थोडीफार नव्हे तर बऱ्याच प्रमाणात अश्याच प्रकारे होत असते. ॲट्रॉसिटी प्रकरणांत त्याचेशी संबंधित असलेल्या इतर व्यवस्थांची (न्यायालय वगळून) प्रत्यक्ष अधिकार व प्रत्यक्ष कृती यांची चर्चा या लेखात केली आहे. ॲट्रॉसिटी म्हणजे काय? अनुसूचित जाती व जमातीच्या व्यक्तीवर होत असलेला जातीवाचक अन्याय. १९५५ साली नागरी हक्क संरक्षण कायद्यात याचा प्रथम उल्लेख आढळतो. तदनंतर १९८९ साली अनुसूचित जाती व जमातींवर होणाऱ्या अत्याचारासाठी प्रतिबंधक कायदा अस्तित्वात आला. त्यानंतर १९९५, २०१३, २०१५ या वर्षांमध्ये त्यात काही दुरूस्त्या झाल्या. या कायद्यात न्यायालयामध्ये प्रकरण जाण्यापूर्वी व याच दरम्यान न्यायालयाव्यतीरिक्त ज्या इतर व्यवस्था काम करतात त्याची चर्चा या लेखात केली आहे. या संस्था कोणत्या? उदा. अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, तपास अधिकारी/पोलीस प्रशासन, दक्षता समिती, समाजकल्याण विभाग, सामाजिक न्याय विभाग, नियोजन आयोग, शासनाच्या विधी सहाय्य विभागातील काही वकील, अनुसूचित जाती सबलीकरण समिती, राज्यपाल कार्यालयातील प्रशासकीय अधिकारी, नागरी हक्क संरक्षण विभाग व अधिकारी इत्यादी संस्था/व्यवस्थांचा समावेश असतो. ॲट्रॉसिटी प्रकरणात या यंत्रणांमार्फत सर्वसाधारण घडत असलेल्या घटनांचा वेध घेण्याचा प्रयत्न या लेखात केला आहे.

१) पोलीस चौकीत तक्रार घेण्यास नकार हा अनुभव नविन नाही. जर तक्रारदाराने तक्रार स्वतः लेखी स्वरूपात घेऊन गेल्यास पोलीस कॉन्स्टेबल ती तक्रार पहिल्यांदा स्वतः वाचतो व ती तक्रार परत तक्रारदाराकडे देतो. ''ही तक्रार आमच्या पोलीस निरीक्षक साहेबांना दाखवा व त्यांनी सांगितल्यानंतर मी ही तक्रार नोंदवितो. सध्या पोलीस निरीक्षकसाहेब बाहेर मिटींगला गेले आहेत. ते केव्हा येतील हे मला सांगता येणार नाही'' असे उत्तर पोलीस कॉन्स्टेबल देतो. दिड तास वाट पाहूनही पोलीस निरीक्षकांची भेट न झाल्याने पोलीस आयुक्त कार्यालयातील एक खिडकी योजनेच्या कार्यालयात (४१ अंश तापमान असलेल्या उन्हाळ्यात ९ किलोमीटर बसने/स्कूटरवर जाऊन) सदर अर्ज द्यावा लागतो. एक खिडकी योजना कार्यालयातील पोलीस कर्मचारी एक वाक्य ऐकवितो ''आपण मूळ पोलीस स्टेशनला सदर

तक्रार अर्ज का दिला नाही?'' त्यास वरील हकीगत ऐकविल्यानंतर अर्ज दाखल होतो. हा अर्ज संबंधित पोलीस स्टेशनकडे वर्ग केला जातो. या प्रकरणासंदर्भात एखादा पी.एस.आय. चौकशी करतो. ॲट्रॉसिटी नियम ७(१) नुसार तपास अधिकारी उपअधिक्षक दर्जापेक्षा कमी नसावा असा उल्लेख आहे. हा पी.एस.आय. या प्रकरणाचा अहवाल तयार करतो. तक्रारदारास तक्रार करण्याची सवय आहे असा शेरा मारतो. एखाद्या व्यक्तीबाबत नऊ प्रकारच्या घटना घडलेल्या असतात. पी.एस.आय. मानसोपचार तज्ञ नाही. तरीदेखील हा शेरा कसा लिहीतात? या प्रकरणाचे समजपत्र अथवा अदखलपात्र गुन्हा याचे पत्र पोस्टाने रवाना केले असा शेरा लिहीतो. तक्रारदारास हे पत्र सहा महिने मिळत नाही. माहिती अधिकारामध्ये माहिती मागविल्यानंतर हे सर्व प्रकार निदर्शनास येतात. पीएच.डी. किंवा पोस्ट पीएच.डी. सारख्या शिक्षण घेणाऱ्या तक्रारदार संशोधकाची चौकशी बी.ए./बी.कॉम. उत्तीर्ण झालेला पी.एस.आय. करतो. या तक्रारदारास विद्यापीठ किंवा संशोधन संस्था पीएच.डी./पोस्ट पीएच.डी. करीता प्रवेश देत नाहीत. बी.ए./बी.कॉम. पी.एस.आय. ला पीएच.डी./पोस्ट पीएच.डी. चे पाच वर्षातील शिक्षण / संशोधन कार्यपध्दती किती माहिती असेल?

२) काही प्रकरणांची चौकशी न्यायालयांत तक्रार दाखल झाल्यानंतर न्यायालयाचे आदेशानुसार नियम १५६ (३) नुसार पोलीसांनी करावयाची असते. याबाबत पोलीसांची सुरूवात एफ.आय.आर. चुकीची (मुद्दाम/नजरचूक) लिहीण्यापासून होते. मग अहवाल/आरोपपत्र तर दूरच राहिले. एका शैक्षणिक संस्थेतील प्रकरणात तक्रारदार संशोधक हा क्लार्क होता. पोलीसांनी एफ.आय.आर. मध्ये फिर्यादी गेली पंचवीस वर्षे शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून कार्यरत असल्याचे नमूद केले.

३) एफ.आय.आर. नंतर तपास सहाय्यक पोलीस आयुक्तांकडे वर्ग होतो. ३८ दिवस आरोपींना समन्स व चौकशी केली जात नाही. फिर्यादीने तपास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात पाच वेळा भेटी देऊनही भेट दिली जात नाही. कॉन्स्टेबलकडे निरोप दिला जातो ''आम्ही तुम्हाला बोलविल्यानंतर या.'' परंतु ४५ दिवस वाट पाहूनही असे घडले नसल्याने पोलीस आयुक्तांना भेटण्याची वेळ येते. पोलीस आयुक्तांना भेटीसाठी क्रमांक ८ असतो. त्यादिवशी एकूण १९ व्हीजीटर्स असतात. ८वा क्रमांक आल्यानंतर पोलीस आयुक्तांचा पी.ए. ''आपण सर्वात शेवटी भेटावे आपली केस संवेदनशिल आहे.'' असे सुचवितो. ३ वाजता भेटीसाठी आलेल्या फिर्यादीस शिताफीने ६.३० वाजेपर्यंत रखडवून ठेवले जाते. पोलीस आयुक्तांच्या भेटीच्या खोलीत तक्रारदार, पोलीस आयुक्त व एक पोलीस निरीक्षक असतात. पोलीस आयुक्त म्हणतात ''आमचा तपास अधिकारी तपास करीत नाही याबाबत न्यायालयात अर्ज करावा.'' परंतु पोलीस आयुक्तांना पुढील विनंती केल्यास फरक पडतो. ''सी.पी. साहेब पोलीस मॅन्युअलनुसार तपास अधिकाऱ्यांनी कोणत्या स्टेप्स घेणे आवश्यक आहे हे पोलीसांच्या गॅझेट/समकक्ष नियमांत नमूद केले आहे.'' पोलीस आयुक्त त्यांच्या पी.आय.कडे पाहतात. दुसऱ्या दिवशी तक्रारदारास पुन्हा बोलावितात. त्यावेळी तपास अधिकाऱ्याची बदली झालेली असते व नविन तपास अधिकारी नेमण्यात येतो.

४) नविन तपास अधिकारी आपले वेगळे रूप दाखवितो. एखाद्या प्रकरणात सात आरोपी असतात. सहा आरोपी एका एरियात राहतात व सातवा त्यापासून १४ कि.मी. अंतरावर राहात असतो. सातव्या आरोपीस समन्स देवून बोलविले जात नाही व त्याचा जबाबही घेतला जात नाही. तसेच तपास अहवालात सर्व सातही आरोपी एका ठिकाणी राहातात असे नमूद करतो.

५) तपास अधिकारी न्यायालयात ९० दिवस तपास करण्याची मुदत मागतो. तपासाचा अहवाल सादर करताना १४ पुरावे वगळुन अहवाल सादर करतो. राज्यपाल कार्यालयाचा लिखित पुरावादेखील अहवालात नमूद करीत नाही. इतर पुराव्यांच काय होत असेल? अहवाल सादर केल्यानंतर पंधराव्या दिवशी सेवानिवृत्त होतो आणि लक्षात येते निवृत्त होणारे तपास अधिकारी का नेमले जातात? माहिती अधिकाराचे कार्यकर्ते शेट्टी यांच्या खुनाचा तपास करणारे पोलीस निरीक्षकांनी असेच केले होते. त्यानंतर त्यांच्या खुनाचा तपास सी.बी.आय. कडे दिल्यानंतर पोलीस निरीक्षकांनी तपास अहवाल चुकीचा तयार केल्याचे निदर्शनास आले होते. मूळ पुरावा लपविणे, गहाळ करणे ही प्रक्रिया पोलीस प्रशासनास नविन नाही.

६) ॲट्रॉसिटी प्रकरणांचा तपास अधिकारी सक्षम असावा, अनुभवी असावा याबाबत नियम ७(१) मध्ये नमूद केले आहे. पोलीस प्रशासनाकडे अर्ज करून या तपास अधिकाऱ्याची शैक्षणिक माहिती, प्रशिक्षणांची संख्या, पोलीस प्रशासनातील सेवेचा कालावधी, उपभोगलेली पदे, किती प्रकरणे हाताळली इत्यादी माहिती मागविल्यास पोलीस प्रशासन माहिती देत नाही.

७) ॲट्रॉसिटी प्रकरणांचा तपास ३० दिवसांत करावा असे नियम ७(२) मध्ये नमूद केले आहे. परंतु अहवाल चक्क ८ महिने १० दिवसांनी सादर करतात. त्याकरीता वेगवेगळ्या प्रशासकीय कारणांचा आधार घेऊन पळवाटा शोधतात.

८) ॲट्रॉसिटी एफ.आय.आर. झाल्यानंतर नागरी हक्क संरक्षण विभागाचे अधिकारी सकाळी ११ वाजता पोलीस चौकीत भेटीस बोलावितात. परंतु प्रत्यक्ष दुपारी १.१५ मिनीटांनी येतात. फिर्यादी यादरम्यान पोलीस चौकीत बसून राहतो. अधिकारी आल्यानंतर फक्त ७ मिनिटै चौकशी करून निघून जातो. पुढे त्याच्या कार्यालयात फिर्यादी भेटीस गेल्यानंतर सहा महिन्यात पाच वेळा भेटीस उपलब्ध नसतो. कार्यालयात निरोप ठेवूनही नंतर फोन अथवा प्रत्यक्ष भेटत नाही.

९) सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त, पोलीस आयुक्त, पोलीस महासंचालक यांच्या भेटी घेऊनही ९ महिने ॲट्रॉसिटी प्रकरणाची माहिती फिर्यादीस/तक्रारदारास न मिळाल्याने तक्रारदार/फिर्यादी मा. राज्यपाल यांना या प्रकरणाबाबत भेटीची वेळ मागतो. राज्यपाल कार्यालयाचा प्रशासकीय अधिकारी फिर्यादी/तक्रारदारास पत्र पाठवितो.'' आपण संघटनेमार्फत राज्यपालांना भेटण्यासाठी केलेली विनंती मान्य करता येत नाही.'' सदर तक्रारदाराने कोणत्याही संघटनेमार्फत पत्राव्दारे अशी मागणी केलेली नसते. हा व्यक्ती कोणत्याही संघटनेत सहभागी नसतो.

१०)अनुसूचित जाती आयोगाकडे तक्रार दाखल करूनही त्यावर कार्यवाही व कारवाई होत नाही. या आयोगाच्या प्रशासकीय अधिकाऱ्याविरूध्द एफ.आय.आर. झालेली असते. याची दखल राज्य व केंद्रीय अनुसूचित जाती आयोग घेत नाही. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाची कार्ये, कर्तव्ये याबाबत ॲट्रॉसिटी ॲक्टमध्ये Rules of Procedure of the National Commission for Scheduled Caste या प्रकरणात दिली आहेत. अनुसूचित जाती आयोगाची ही परिस्थिती तर इतर व्यवस्थांचे काय? अनुसूचित जाती आयोगाच्या आरोपी असलेल्या प्रशासकीय अधिकाऱ्याचा जबाबही पोलीस घेत नाहीत.

११)सार्वजनिक ठिकाणी एका अनुसूचित जातीच्या व्यक्तीस प्रवेश नाकारल्याप्रकरणी २०१६ साली पोलीस प्रशासनास दिलेला तक्रार अर्ज कोणतीही कार्यवाही व कारवाई न होता दप्तरी किंवा कचरापेटीत जातो.

१२)दक्षता समितीमध्ये ३५ मिनीटात १४ प्रकरणांची चर्चा होते. या कालावधीत चर्चा चालू असताना दक्षता समितीचे अध्यक्ष असलेले जिल्हाधिकारी वारंवार मोबाईलवर बोलत असतात. या संवेदनशिल प्रकरणांचं किती गांभीर्य समजाव? त्यांचा कार्यभार मोठा आहे याबाबत शंकाच नाही.

१३)दक्षता समितीचे दुसरे सदस्य म्हणजे अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी. सभेमध्ये प्रकरणांची चौकशी चालू असताना मध्येच ''आम्हाला आयकार्ड मिळाले नाही, पोलीस चौकीत आमच्या नावांची यादी नाही.'' अशा प्रकारची चर्चा सुरू करतात. सभा संपल्यानंतर तक्रारदार/फिर्यादीस विचारतात ''आर्थिक बहिष्कृत कोणता नियम आहे. ॲट्रॉसिटी ॲक्टनुसार त्याचा काय अर्थ?'' दक्षता समितीच्या सदस्यांच असे अज्ञान असेल तर....?

१४)दक्षता समितीचे सदस्य विशेष समाजकल्याण कार्यालयातील पोलीस अधिकारी. हा आठ महिने प्रकरण दक्षता समितीसमोर ठेवतच नाही. तक्रारदाराने माहिती अधिकाराचा अर्ज केल्यानंतर ८ महिन्यांनी ॲट्रॉसिटीचे प्रकरण दक्षता समितीपुढे चर्चेस येते.

१५)दक्षता समितीमध्ये पोलीस प्रशासनाची आणखी एक भूमिका म्हणजे दक्षता समितीचे सदस्य असलेला पोलीस उपायुक्त/अधिक्षक. दक्षता समितीमध्ये एखाद्या ॲट्रॉसिटी प्रकरणाची चर्चा चालू असताना फिर्यादीस/तक्रारदारास वारंवार ''तपास चालू आहे नंतर पाहू'' असे बजावून गप्प बसण्यास सांगतो.

१६)या सर्व प्रकरणांची माहिती नियोजन आयोग, अनुसूचित जाती सबलीकरण समिती, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, सामाजिक न्याय विभाग इत्यादी कार्यालयांना पत्राव्दारे कळवूनही सहा-सात वर्षे उपाययोजना होत नाही. याच दुःख वेगळ आहे.

१७)एखाद्या शासकीय सेवकाने अशा प्रकारची केस केल्यास त्याची परजिल्ह्यात बदली ठरलेली किंवा त्या सेवकास कार्यालयाच्या आवारात अनोळखी व्यक्तींकडून दमदाटी ठरलेली. याच सीसीटीव्ही फूटेज कार्यालयाकडे मागविल्यास सीसीटीव्ही दुरूस्तीकरीता काढले असल्याने उपलब्ध नाही असे उत्तर मिळते. पोलीसांना ही बाब सांगितली तर त्याकडे दुर्लक्ष केले जाते.

१८)नागरी हक्क संरक्षण विभागाचे अधिकारी असलेले पोलीस उपअधिक्षक तपास अधिकाऱ्यास पत्राव्दारे ॲट्रॉसिटी गुन्ह्याचा तपास करण्यासाठी २८ सूचना कळवितात. यापैकी दहा ते बारा सूचनांचे पालन तपास अधिकारी करतो.

१९)या सर्व परिस्थितीनंतर तपास अधिकारी दहा महिन्यांनी स्वतःचे सेवानिवृत्तीच्या पंधरा दिवस अगोदर अहवाल सादर करतात, अहवाल अ, ब किंवा क समरी करतात. याचा मतितार्थ हे प्रकरण आरोपपत्र दाखल करण्यास पात्र नाही. या अ, ब, क समरीविषयी पोलीस मॅन्युअल व्यतिरिक्त कोठेही माहिती उपलब्ध नसते. पोलीस मॅन्युअल कोठेही विकत मिळत नसल्याने माहिती अधिकारामध्ये मागणी केली जाते. याचे प्रमाण जास्त असल्याने पोलीस प्रशासनाने पोलीसांचे कामकाज पारदर्शक असावे याकरीता स्वतंत्र परिपत्रकही जारी केले आहे. २०१५ साली १ हजार ५८६ पोलीसांविरूध्द खातेनिहाय चौकशी करण्यात आली. ३२ कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आले. २१७ पोलीसांवर दोषारोप ठेवण्यात आले.

२०)विधी सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती, जमाती, महिला व आर्थिक दुर्बल घटकातील व्यक्तींना मोफत वकिली सहाय्य मिळण्याची तरतुद आहे. विधी सहाय्य विभागाकडून असा वकिल मिळाल्यास तो साडेतीन महिने याचिका दाखल करीत नाही. दर आठवड्यास पिडीत व्यक्तीस बोलावून वेगवेगळे कागद, पुरावे यांची माहिती घेतो. साडेतीन महिन्यांनी ही केस ॲट्रॉसिटीत बसत नाही असे सांगतो. विधी विभागाकडे याबाबत चौकशी केल्यास दुसऱ्या वकिलांची नावे व फोन नंबर दिले तर त्यांची उत्तरे ''ॲट्रॉसिटी केसेस सक्सेस

होत नाहीत, मला महिनाभर वेळ नाही नंतर पाहू.'' इत्यादी उडवाउडवीची उत्तरे मिळतात. या सर्वांची तक्रार विधी सहाय्य विभागाकडे केल्यानंतर नविन वकील बदलून मिळतो. हा विधी सहाय्य विभागाचा नविन वकील अवघ्या पाच दिवसांत नियम १५६(३) नुसार केस दाखल करून पुढील ३० दिवसांत न्यायालयामार्फत पोलीसांना तपासाचे आदेश मिळवून घेतो.

या सर्व प्रकरणांचा पाठपुरावा करताना फिर्यादी/तक्रारदार व्यक्तीच काय होत असेल? आणि या अशा तकलादू किंवा खिळखिळी झालेल्या प्रकरणाच आरोपपत्र/अहवाल पोलीस प्रशासन सादर करते. या सर्व बाबींचा संशोधनपर अभ्यास केल्यास काही निष्कर्ष निघू शकतात.

(अ) ॲट्रॉसिटी ॲक्टमधील पोलीसांची तिहेरी भूमिकेपैकी दोन भूमिकातरी रद्द व्हाव्यात.

१) तपास अधिकारी,

२) विशेष समाजकल्याण कार्यालयातील पोलीस अधिकारी,

३) दक्षता समितीमधील सदस्यत्व.

(ब)अशासकीय सदस्यांपैकी एक वकील असावा.

(क) ॲट्रॉसिटीच्या प्रकरणातील इतर शासकीय व्यवस्था (न्यायव्यवस्था वगळून) करीत असलेल्या कार्याच हस्तकुशलता, हातचलाखी किंवा मॅन्युप्युलेशन होऊ नये.

**संदर्भ :-**


१) नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५.

२) ॲट्रॉसिटी ॲक्ट १९८९

३) ॲट्रॉसिटी ॲक्ट १९९५

४) ॲट्रॉसिटी ॲक्ट २०१३, २०१४.

५) भारती सावंत व आनंद सावंत : पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना दैनंदिन कामासाठी व तपासासाठी उपयुक्त शासन निर्णय, परिपत्रके व आदेश, भाग १,२,३ सतिश प्रकाशन, मुंबई, वर्ष २०१६.

६) माहिती अधिकार पत्र क्र. सहा.आयु.पुणे, मा.अ.-५/माहिती तुनिनिकाळजे, २०१५-१६, का.पुणे ४७७३ दि. २९/१२/२०१५.

७) पोलीसांविरूध्द तक्रारीत वाढ, दै. लोकमत दि. २ डिसेंबर २०१६ पृष्ठ २.

८) जा.क्र. ८७/२०१५ पोलीस अधिक्षक ना.ह.सं. परिक्षेत्र कोलपूर/ दि. २२/०१/२०१५.

९) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र CS/Pu/37/09/(6910)/107 दि. १२ जानेवारी २०१०.

१०) आर.सी.सी. १३४/२००४ विश्रांतवाडी पो. स्टेशन, पुणे.

११) पो. प. प. क्र. २५८९/भाग-३ दि. २१/१२/२००१.

१२) पो. प. प. क्र. २३२४/भाग-३ दि. १९/६/२००२ अ.क्र.४, १०.